# एक परीकथा



विनायक पोतदार

# एक परीकथा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# एक परीकथा

लेखक

विनायक नारायण पोतदार

# एक परीकथा

## लेखक : विनायक नारायण पोतदार

ph.no.9076640007

vienayak007@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

www. esahitybooks

**प्रकाशन : २४ जून २०१८**


©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# विनायक नारायण पोतदार



श्री विनायक नारायण पोतदार गेली दहा वर्षे मीडियामध्ये कार्यरत आहेत. गायक, सूत्रसंचालक, रेडिओ जॉकी, टीव्ही होस्ट आणि आता क्रिएटिव्ह रायटर म्हणून जाहिरात कंपनीमध्ये असा त्यांचा नदीच्या प्रवाहासारखा अखंड प्रवास सुरु आहे. ते फिल्म सिने रायटर असोसिएशनचे सदस्य देखील आहेत. त्यांच्या सर्व कथा या संस्थेकडे नोंदणीकृत आहेत. लेखक कथा लेखनाव्यतिरिक्त गीत लेखन, धून बनवणे आणि विविध प्रकारची गाणी देखील गातात. त्यांचे आवडते लेखक वपु काळे, पुल देशपांडे, विजय देवधर, सुरेंद्र मोहन पाठक आहेत. याशिवाय अध्यात्म मध्ये ओशोंचा त्यांच्यावर खूप प्रभाव आहे.

आपला कथेबाबतचा अभिप्राय जाणून घेण्यास ते उत्सुक आहेत.

विनायक नारायण पोतदार

ph.no.9076640007

vienayak007@gmail.com

सदर कथा संपूर्णतः काल्पनिक आहे. वास्तवतेशी तिचा कोणताही संबंध नाही. कथेतील जागांची नावे केवळ कथेला रंजकता यावी म्हणून घेतलेली आहेत. ही कथा तुमचं मनोरंजन करण्यात यशस्वी ठरो हीच ईश चरणी प्रार्थना.

# A Fairy tale

लेखक : विनायक नारायण पोतदार

मेल आयडी : vienayak007@gmail. com

संपर्क : ९०७६६४०००७/८४२१८७३७००



# एक परीकथा (A FAIRY TALE )

गोव्यामध्ये मला आलेल्या विलक्षण अनुभवाबद्दल तुम्हांला सांगावं की सांगू नये या बाबत मी स्वतःशी हजारो वेळा वाद घातला असेल. पण शेवटी दोन पैकी एक मन जिंकलं. तुमच्याशी शेअर करावं हे सांगणारं. म्हणून आज तुमच्यासमोर आज माझ्या आयुष्यातील तो अनुभव शेअर करतोय. तुम्हांला पटो किंवा न पटो पण मी तो तुमच्यासोबत शेअर करणार आहे. पण त्या आधी माझी ओळख करून देतो.

मी निखिल राजवर्धन. माझ्याबद्दल एका वाक्यात सांगता येणं थोडं अवघड आहे. कधी गातो .... कधी लिहितो ... कधी खूप बडबड करून मैफिल गाजवतो, कधी सगळ्यांपासून दूर एकटाच एकांतात स्वतःला कोंडून टाकतो... काहीजणांच्या मते मी प्रचंड लहरी आहे. (असेल ही तसं!) ... पोटासाठी

इतरांसारखाच चाकरी करणारा असलो तरी जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा माझ्यातल्या लपलेल्या 'मी' ला बाहेर काढायचा मी नेहमी प्रयत्न करत असतो.

गेल्या काही दिवसांत नोकरी करता करता लिहिलेल्या माझ्या कथेला इंटरनेटवरून समाजाच्या सर्व स्तरातून लाभलेल्या कौतुकाच्या प्रतिक्रियांनी मी भांबावून गेलो होतो. गोष्ट सुखावणारी असली तरी, इतक्या मोठ्या यशाची अपेक्षा मी केली नव्हती. त्यामुळे आता नवीन कथेची आतुरतेनं प्रतीक्षा करणाऱ्या माझ्या या वाचकवर्गाला काही चांगलं देण्याची मोठी जबाबदारी माझ्यावर येऊन पडली होती. आणि त्यानंतर कित्येक दिवस विचार करूनदेखील काही चांगलं असं सुचतच नव्हतं.

शेवटी ठरवलं की आता विचार करणं सोडून द्यावं आणि मनमोकळं फिरून यावं. आणि यासाठी गोव्यासारखं दुसरं ठिकाण नाही.. किमान माझ्यासाठी तरी... तुमच्या मनःशांतीसाठी तिथं प्राचीन भव्य मंदिरं आहेत, घनदाट झाडीने भरलेला निसर्ग आहे... फेणीची नशा आहे, अथांग पसरलेला समुद्र आहे... संध्याकाळच्या वेळी सूर्यास्त होत असताना समुद्राच्या कडेने दूरवर चालत जायचा आनंद तर काही औरच ! आणि बीचजवळच्या रिसॉर्टमधील बाल्कनीत बसून संध्याकाळच्या वेळी ड्रिंकचा स्वाद तर विचारूच नका.

मी त्याच आठवड्यात वीकएंडला गोव्यात दाखल झालो. बागा बीचवरील एक रिसॉर्ट मी तिथं येण्यापूर्वीच ऑनलाईन बुक करून ठेवलं होतं. फ्रायडे नाईट फ्लाईट पकडून रिसॉर्टवर पोहोचायला मला रात्रीचे अकरा वाजले. मी रूमवरच रात्रीचं जेवण मागवलं आणि जेवण करून पहाटे ५ चा अलार्म लावून मी झोपी गेलो, कारण रिसॉर्टच्या बॅकसाईडलाच बीच होतं. मला पहाटे पहाटे बीचवर वॉकला जायचं होतं. आज पर्यंत मी संध्याकाळचं वॉक खूप वेळा केलं होतं, पण अर्ली मॉर्निंग वॉकचा योग आला नव्हता.

पहाटे मोबाईलमध्ये लावलेल्या अलार्मने मला जाग आली. दहा मिनिटात तयार होऊन बाहेर पडलो. यावेळी मी अनवाणी जायचं ठरवल्यानं पायात चपला घातल्या नव्हत्या. सकाळच्या वेळी थंड वाळूचा स्पर्श पायाच्या तळव्यांना सुखावणारा असणार याची खात्री होती. अवघ्या पाच मिनिटात मी रिसॉर्टच्या मागे असलेल्या बीचवर पोचलो. आणि थंडगार वाळूचा स्पर्श पायांना झाल्यावर जो काही आनंद झाला तो अवर्णनीय होता. तो स्पर्श शब्दांत मांडण्यासारखा नाही. प्रत्येकानं तो स्वतःच घ्यायला हवा.

समुद्राच्या लाटांचा घनगंभीर आवाज सोडला तर फक्त माझ्या श्वासाचा आवाज माझ्या सोबत होता... किनारा ओसाड होता.. मनःशांती साठी अशावेळी ध्यानमग्न होण्याची आवश्यकता पडत नाही. फक्त कानावर पडणारे आवाज ऐकत रहा आणि बस ऐकत रहा. तुम्ही आपोआप ट्रान्समध्ये जाता. वेगळं काही करण्याची गरजच उरत नाही.

मी किती वेळ चालत राहिलो आठवत नाही, पण उजाडायला सुरुवात झाली, किनाऱ्यावर थोडी वर्दळ सुरु झाली तसा मी परत फिरलो. नंतरचे दोन तास मी रिसॉर्टच्या स्विमिंग पूलमध्ये येथेच्छ डुंबत राहिलो. दिवसाची सुरुवात खरंच खूप छान झाली होती... त्यानंतर नाश्ता मग एसी रूममध्ये लंचच्या वेळेपर्यंत मस्तपैकी एक झकास सिनेमा पाहिला. जेवण खरंच रुचकर होतं. (कदाचित मूड झकास असल्यामुळंदेखील मला ते रुचकर लागलं असावं.) त्यानंतर पुन्हा निद्रादेवीच्या आधीन झालो.

संध्याकाळी सहाच्या सुमारास मी पुन्हा बीचवर फिरायला गेलो. यावेळी थोडं आणखी लांब चालायचं ठरवलं. मला असं एक ठिकाण हवं होतं जिथं केवळ समुद्र आणि मी असेन. बराच लांबचा पल्ला गाठल्यावर मला अशी जागा मिळाली. समुद्राच्या कडेला एक मोठा खडक होता समुद्राचं पाणी तिथं पर्यंत येऊन परतून जात होतं. मला ती जागा खूप आवडली. मुख्य म्हणजे तिथं दुसरं कुणी ही नव्हतं.

मी आणि समुद्र.. मी त्या खडकावर जाऊन बसलो... बराच वेळ समुद्राच्या लाटांचा आणि घोंघावणाऱ्या वाऱ्याचा आवाज या व्यतिरिक्त इतर काहीही ऐकू येत नव्हतं. मध्येच पक्षांचा किलबिलाट ऐकू यायचा. पण बस्स ! तेवढ्यापुरताच. मी खरंच ट्रान्समध्ये गेलो होतो.पण अचानक माझी तंद्री भंग झाली.

"स्क्युज मी? मे आय जॉईन यु इफ यू डोन्त माईंड?" खरं तर या वाक्यानं मला खूप संताप यायला हवा होता. अशा वेळी कुणीही डिस्टर्ब् केलेलं मला अजिबात आवडत नाही. पण या आवाजात अशी काही जादू होती की मी भारला गेलो होतो. जणू कुणी फक्त आवाजानं माझ्यावर गारुड केलं होतं. आणि जेव्हा मी वळून पाहिलं तेव्हा तर मी आश्चर्याच्या धक्क्यानं कोसळता कोसळता वाचलो.

"हेल्ल्लो .... दिद आय दिस्टर्ब् यू? आय एम सॉरी.." माझ्यासमोर ती उभी होती. उंच, गोरीपान, निळया डोळयांची... रशियन मुलगी . साधारणपणे ३०-३२ वयाची. तिचे लांब सडक काळे केस वाऱ्यावर उडत होते, जे तिच्या सौन्दर्यात आणखी भर घालत होते. पण धक्का मला यामुळं बसला नव्हता. सुंदर स्त्रियांना मी यापूर्वी कधी पाहिलं नव्हतं असं नाही. उलट मी ज्या क्षेत्रात काम करत होतो, तिथं एकापेक्षा एक सुंदर मुलींचा ताफाच होता.

मला धक्का बसायचं कारण होतं, दहा वर्षांपूर्वी वेबसाईटवरून मला मेल करणारी, माझ्या प्रेमात पडणारी आणि न चुकता रोज मेल पाठवणारी करीना अगदी हुबेहूब अशीच होती. जिला आजपर्यंत केवळ मी व्हिडीओ कॉल वर पाहिलं होतं, फोटोतून पाहिलं होतं, आज साक्षात जणू तीच समोर उभी असल्याचा भास मला झाला आणि यामुळंच मी अक्षरशः कोसळता कोसळता वाचलो होतो.

"हॅलो मिस्तर ... आय एम तोकिंग विथ यू ...." मी तिच्या प्रश्नाने पुन्हा भानावर आलो. " ओह .... आय एम सॉरी... प्लिज जॉईन ... " मी म्हणालो.

“थँक यू मिस्तर .... व्हाट्स यूर नेम?”

“निखिल... निखिल राजवर्धन” मी तिच्याशी शेकहॅन्ड करत बोललो. ती माझ्या शेजारी येऊन बसली. एकदा तिने माझ्याकडे टक लावून पाहिलं. आणि काही बोलणार असं वाटलं तोपर्यंत ती गप्प झाली.

बराच वेळ आम्ही समोर घनगंभीर आवाज करणाऱ्या समुद्राकडे पाहत राहिलो. नंतर सूर्यास्त झाल्यावर संधिप्रकाश असतानाच मी उठलो. माझ्या पाठोपाठ ती ही उठली. संधीप्रकाशात तिचं सौन्दर्य आणखीच खुललं होतं. मुळातच गोरापान असलेला चेहरा आणि त्यावर चढलेली संधिप्रकाशाची लालिमा यामुळं ती अफलातून दिसत होती. माझ्या मागोमाग ती ही किनाऱ्यावर आली आणि आम्ही एकत्रच वाळूवरून रिसॉर्टच्या दिशेने चालायला सुरुवात केली.

माझं इंग्लिश फार चांगलं नव्हतं. त्यामुळं मनात असूनही तिच्याशी बोलायला मी टाळत होतो. ती माझ्यासोबत चालतेय हेच माझ्यासाठी मोठं होतं. पण आमच्यातील शांततेचा भंग शेवटी तिनेच केला.

“वेअर आर यू स्तेयिंग?”

“टॉप इन टाउन रिसॉर्ट” मी उत्तर दिलं.

“वॉव. व्हॉत ए को-इन्सिदन्स. सेम हियर. व्हातस् यूअर सूत नम्बर?” ती आश्चर्याने आणि आनंदाने बोलली.

“ १०३”

“ग्रेत . आय जस्त तू (२) सूतस् अवे फ्रॉम यू . माईन इज १०५ . वूद यू लाईक तू जॉईन मी फॉर दिनर?”

मला क्षणभर काय उत्तर द्यावं हेच कळत नव्हतं. मी गोंधळलोय हे पाहून तिला हसू आलं. हसत हसत ती म्हणाली, “दू नॉत गेत मी रॉंग मिस्टर निकील. आय तोतली अलोन हियर अँद नीद अ गुड कम्पॅनियन.. नथिंग मोअर दॅन दॅत.” ती म्हणाली.

“ओके. डन.” मी पण खिजल्यासारखा हसत म्हणालो.

खरं तर तिच्यासारख्या सुंदर मुलीसोबत वेळ घालवायला कुणीही एका पायावर तयार झालं असतं. आणि इथे तर ती स्वतःहून मला डिनर ऑफर करत होती. पण माझा कॉन्फिडन्स लूज होत होता कारण मला तिच्याशी इंग्लिशमधून सराईतपणे बोलता येईल याची खात्री नव्हती. पण नंतर तिनेच या समस्येवर उपाय शोधून दिल्यासारखं वाटलं.

“मिस्तर निकील ऍक्च्युअली आय एम नॉत कम्फरतेबल विद इंग्लिश. आय एम फ्रॉम रशिया. सो प्लिज एड्जस्त मी इफ आय तॉक रॉंग.”

माझ्या मनावरचं ओझं हलकं झालं हे ऐकून. आता मला लाज वाटायचं काही कारण नव्हतं. पण दुसऱ्या क्षणी मी पुन्हा चमकलो. ही पण रशियावरून आलेली. आणि मला ई मेल करणारी करीना पण रशियाचीच. काय हा चमत्कारी योगायोग!

“सो यू आर हिअर फॉर चेंज ओन्ली? ऑर फॉर सम काइंड ऑफ ऑफिशियल वर्क?” मी बऱ्यापैकी चांगलं इंग्लिश बोलायचा प्रयत्न करत तिला विचारलं.

“यू कॅन से फॉर अ चेंज. वि विल डिस्कस इट मोअर ऑन डिनर.” तिनं यावर आता बोलायचं टाळलं हे माझ्या लक्षात आलं. त्यानंतर आम्ही काही न बोलता शांत किनाऱ्यावरून चालत राहिलो. साधारणपणे अर्ध्या तासानंतर आम्ही

रिसॉर्ट वर पोहोचलो. दोघांचे सूट एकाच फ्लोअरवर असल्यानं आम्ही एकत्रच पायऱ्या चढून पहिल्या मजल्यावर गेलो. आम्ही उजव्या बाजूने जिना चढून वर गेल्याने पहिला माझा सूट लागला. तिने बोटाने आपल्या सूट कडे इशारा करत सांगितलं. “ आय विल बी रेडी बाय ९.३० . यू अल्सो गेट रेडी अप टू दॅट टाइम. अँड कम टू माय सूट. ओके? “ मी होकारार्थी मान हलवली आणि सूट मध्ये जाऊन दार लावून घेतलं. बेडजवळ पोचून तिथल्या एका खुर्चीत बसून मी एसी ऑन केला. बाहेरून आल्यामुळं शरीर घामानं चिंब झालं होतं. इतका वेळ त्याची जाणीव झाली नव्हती. कारण ती सोबत होती. पण रूम मध्ये पोहोचताच त्याची जाणीव झाली. खरंच काय योगायोग होता ! मी गोव्याला येणं, याच रिसॉर्टमध्ये उतरणं, तिचं मला समुद्र किनाऱ्यावर दूरवर असलेल्या एकांत ठिकाणी भेटणं, आणि तिच्या आणि करीनाच्या चेहऱ्यातील विलक्षण साम्य ! माझं मन दहा वर्ष मागे गेलं.

त्यावेळी इंटरनेट ही गोष्ट इतकी अंगवळणी पडली नव्हती. सारं काही नवं नवं होतं. ऑर्कुट, रेडीफमेल, याहू, जीमेल या गोष्टीबद्दल कुतूहल होतं. सातासमुद्रापलीकडले नवंनवीन मित्र ऑर्कुटमुळे मिळायचे. त्यांच्याशी गप्पा मारताना खूप आनंद व्हायचा. आजच्यासारखं तेव्हा फेसबुक जोरात नव्हतं. ऑर्कुट नम्बर वन होतं. शिवाय स्टाईल, हाय५, असे काही प्लॅटफॉर्म होते. त्यातल्याच कुठल्याश्या प्लँटफॉर्मवरून मला फ्रेंड रिक्वेस्ट आली होती करीनाची. खरं तर हे नाव एखाद्या रशियन मुलीचं असू शकतं यावरच माझा विश्वास बसला नव्हता तेव्हा. पण एक कुतूहल म्हणून मी ती फ्रेंड रिक्वेस्ट एक्सेप्ट केली होती. त्यानंतर माझं किंवा

तिचं सारखं नेट कॅफे मध्ये जाणं होत नसल्याने (तेव्हा आजच्यासारखे स्मार्ट फोन नव्हते, फिचर फोन्स होते. त्यामुळं नेट कॅफे मध्ये जाऊनच सर्वजण चाट करायचे.) तिनं मला मेल लिहायला सुरुवात केली. सुरुवातीला फ्रेंडशिप असलेलं नातं बघता बघता प्रेमात कधी बदललं कळलंच नाही.

रशियाच्या कुठल्याशा लहानशा खेड्यात ती राहायची.तिथं इंटरनेटची सुविधा नसल्याने तिला जवळच्या शहरात यावं लागायचं. त्यामुळे जेव्हा जेव्हा तिला वेळ मिळेल तेव्हा तेव्हा ती भलं मोठं पत्र मला लिहायची. आम्ही एकमेकांच्या प्रेमात अगदी आकंठ बुडालो होतो. तिचं पत्र आलं नाही की मी बैचेन होऊन जायचो. कधी कधी आठवडाभर तिचं पत्र यायचं नाही. माझ्याकडे तिच्याशी संपर्काचा दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. केवळ वाट पाहणं इतकंच हाती होतं.

मग जेव्हा तिचं मेल यायचं तेव्हा तो दिवस माझ्यासाठी सर्वात आनंदी दिवस ठरायचा. पुढचं मेल येईपर्यंत मी तेच पत्र पुन्हा पुन्हा वाचायचो. सुरुवातीला तिने मला फोटो पाठवले. नंतर मग जेव्हा तिची माझ्याबद्दल पूर्ण खात्री झाली तेव्हा तिनं मला स्वतःचा व्हिडीओ पाठवला ज्यात ती माझ्याबद्दल खूप हळवी झाली होती. पहिल्यांदा मी तिचा आवाज आणि चेहरा एकत्र पाहिला. “आय लव्ह यू निकी ... आय कान्त लिव् विदाउत यू “ शेवटचे शब्द बोलताना तिच्या सुंदर डोळयांमध्ये पाणी आलं होतं. मी आज ही ते शब्द हृदयात साठवून ठेवले आहेत. तिनं त्यात मला भेटायची इच्छा व्यक्त केली होती. तिचं संपूर्ण आयुष्य आता तिला माझ्यासोबत घालवायचं होतं. माझ्या मुलांची आई व्हायचं होतं. आमचं नातं एका नाजूक वळणावर पोचलं होतं. तिने मला तिच्या फॅमिलीसोबत काढलेले फोटो पण पाठवले होते. तिची आई पण माझ्याबद्दल तिच्याकडून खूप कौतुकाने ऐकायची. तिच्या आईला भारताबद्दल प्रचंड प्रेम होतं. आणि लेकीचा माझ्या सोबत लग्न करून भारतात राहायचा निर्णय तिला मान्य होता.

करिनाने तिच्या परिस्थितीबद्दल कधीच लपवलं नाही. ती एका सामान्य कुटुंबातील मुलगी होती. तिच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्य पैसे कमवण्यासाठी काम करायचा. त्यामुळं माझ्याकडं येण्यासाठी व्हिसा, पासपोर्ट या सगळयासाठी लागणारा पैसा तिच्याकडं नव्हता. ती तो जमवत होती. तिने माझ्याकडे या सर्व गोष्टींसाठी पैसे पाठवशील का असं विचारलं आणि तिथूनच आमच्या नात्यामध्ये दुरावा यायला सुरुवात झाली. मी तिला पैसे पाठवण्यापूर्वी एका मित्राला माझी ही ई-मेल लव्ह स्टोरी सांगितली. त्याने सांगितलं की या प्रेमाला फसू नकोस आणि पैसे पाठवू नकोस. अशा खूप मुली प्रेमाचं नाटक करतात, पैसे उकळतात आणि गायब होतात.

तो खूप विश्वासातील मित्र असल्याने मी पण सांशक झालो आणि तिच्या मेल्सना रिप्लाय करणं बंद केलं. ती खूप कळवळून सांगायची.. मला एकदा तुझ्याकडे येऊ दे, तुझ्या मिठीत स्वतःला हरवून टाकायचं आहे मला सगळं आयुष्य तुझ्यासोबत घालवायचं आहे.. जर तुला मी आवडले नाही, तर मी पुन्हा रशियाला निघून येईन तुला कोणताही दोष न देता. पण एकदा तुझ्याकडे येऊ दे मला. पण मी आता कठोर झालो होतो. मी घाबरलो होतो. माझ्या प्रेमावरचा माझा विश्वास उडाला होता.

जवळपास एक महिना तिची पत्रं येत राहिली. पण मी तिला लिहायचं बंद केलं होतं. त्यामुळे तिने ही पत्रं लिहायचं थांबवलं. शेवटचं तिचं पत्र आलं त्यात तिनं लिहिलं होतं की मीच प्रेमात कुठंतरी कमी पडले. म्हणून तू माझ्यावर विश्वास ठेवत नाहीयेस. आता मी पत्र लिहिणार नाही. आता आपली भेट नशिबात असेल तर होईल.

त्यानंतर मात्र तिनं एक ही मेल लिहिलं नाही. मी देखील हळूहळू यातून बाहेर आलो.

कालांतराने माझं लग्न झालं. पण ते टिकलं नाही. अवघ्या घडीभराचा डाव असल्यासारखा संसार विस्कटला. हा काळ माझ्यासाठी खूपच खडतर ठरला. पण मी स्वतःला सावरलं आणि पुन्हा नव्या उमेदीने मुंबईत येऊन करियरची नव्याने सुरुवात केली. माझा जॉब सांभाळत मी लिहायला सुरु केलं आणि पहिल्याच कादंबरीला वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. आता माझ्यावर पुन्हा काही चांगलं त्यांना द्यायची जबाबदारी पडली होती. त्यासाठीच मन रिफ्रेश करायला मी गोव्यात दाखल झालो होतो आणि इतक्या वर्षानंतर त्या रशियन मुलीने जुनी हळवी जखम ताजी केली होती.

रात्री ठीक ९.३० ला मी तिच्या सूटची बेल वाजवली. तिने दार उघडलं. काय जबरदस्त दिसत होती ती! पांढऱ्या रंगाचा संपूर्ण पोशाख तिनं परिधान केला होता. एखाद्या परीसारखीच वाटत होती ती जणू!

“कम इन मिस्तर निकील” तिनं नाजूक आवाजात मला बोलावलं. आतमध्ये एक मंद सुवास दरवळत होता. आमचं डिनर समोर टेबलवर मांडून ठेवलं होतं. आणि बाजूलाच वाईनची बॉटलसुद्धा ठेवली होती. वातावरणात एक प्रसन्नता भरून राहिली होती.

“वूद यू लाईक तू गो विथ वाईन बिफोर दिनर?” तिनं विचारलं.

“शुअर” मी म्हणालो. कदाचित त्यामुळं माझा तिच्याशी बोलण्यासाठीचा विश्वास आणखी वाढला असता.

तिनं दोघांसाठी दोन ग्लासात वाईन ओतली. आम्ही चिअर्स केलं आणि ग्लास हातात घेऊन रूमला लागून असलेल्या बाल्कनीमध्ये आलो. रात्रीचा गार वारा सुटला होता. समुद्राच्या लाटांचा आवाज दूरवरून कानावर येत होता.

“मिस्टर निखिल, दू यू बिलिव् इन लव्?” तिच्या प्रश्नानं मी चमकून तिच्याकडं पाहिलं. तिनं पुन्हा विचारलं, “ दू यू?”

“येस.” मी म्हणालो.

“दिद यू लव् एव्हर इन युअर लाईफ?”

“येस. लॉंग टाइम एगो. दॅट वॉज लाईक अ फेअरी टेल फॉर मी विच नेव्हर केम इंटू रिअल.” हे बोलताना पुन्हा माझ्या मनात करीनाचा विचार आला.

“आय वूद लाईक तू नो अबाऊत युअर फेअरी तेल” तिनं विनंती केली.

“सॉरी. प्लिज डोन्ट इन्सिस्ट मी टू स्पिक ऑन दॅट.” मी तिला विनंती केली.

“इत सिम्स लाईक युअर स्तोरी हॅज पेनफुल एन्ड.” ती म्हणाली. “मे आय आस्क हर नेम?” ती खूपच हळवी झालीय असं तिच्या आवाजावरून वाटत होतं.

“करीना.” आता माझा आवाज पण कातर झाला होता.

“व्हॉत हॅपन्द विद यू अँड करीना? दिद शी बेट्रे यू?”

“नो.. नो ... ऍक्च्युअली आय वॉज नॉट शुअर अबाऊट हर लव्ह .. आय थॉट शी वॉज प्लेयिंग विद मी जस्ट फॉर मनी.. सो आय स्केअर्ड अँड ....”

“स्तोप रिप्लायिंग हर?” तिनं विचारलेल्या प्रश्नानं मी उडालोच. “हाऊ कॅन यू से दॅट?”

“कम विद मी. आय वॉन्त तू शो यू समथिंग.” तिनं माझा हात धरून आत नेलं. तिच्या बेडवर लॅपटॉप पडला होता. तिनं तो उघडला आणि तिचा मेल बॉक्स ओपन केला. इनबॉक्स ऑप्शन वर क्लिक केलं. आणि बारा वर्षांपूर्वीची डेट टाकली. त्यानंतर जे मला दिसलं ते पाहून माझाच विश्वास बसत नव्हता.

ती सर्व मी करीनाला पाठवलेली मेल्स होती. एक एक मेल तिनं ओपन करून दाखवायला सुरु केलं. मी जसजशी नजर फिरवू लागलो तसतशी माझी मेल दिसायला लागली होती. मी चमकून तिच्याकडं पाहिलं. ती शांतपणे उभी होती. तिच्या डोळयांतून अखंड अश्रूच्या धारा वाहत होत्या.

“ करीना ..... आर यू ... द वन आय एव्हर लव्ह्ड?” मी तिला विचारलं.

“ नो. आय एम द वन यू नेव्हर बिलीव्हड” असं म्हणून तिने मला जोरात थप्पड लावली. दुसऱ्या क्षणी ती माझ्या मिठीत होती. आम्ही दोघेही फक्त अश्रू ढाळत होतो. कित्येक मिनिटं अशीच गेली.

“व्हाय दिद नॉत यू बिलिव् मी? व्हाय दिद यु लिव्ह मी?” ती पून्हा पुन्हा हेच म्हणत राहिली.

थोड्या वेळानं आम्ही सावरलो. तेव्हा मी तिला विचारलं “ हाऊ डिड यू फाईंड मी आफ्टर सो मेनी इयर्स?”

"अ त्रू लव् अल्वेज फाईंद इतस वे. आय सर्च यू ऑन फेसबुक. आफतर मेनी त्राईज आय गॉत यू. युअर फोन नम्बर वॉज अल्सो देअर. बाय गेतींग दॅत नम्बर. रेस्त वॉज जस्त तू फाईंड युअर लोकेशन. दॅतस व्हाय आय अल्सो बुक्ड हिअर. अँड आय वॉज फॉलोविंग यू "( खरं प्रेम नेहमीच आपला मार्ग शोधून काढतं. मी तुला फेसबुकवर शोधून काढलं. खूप प्रयत्न केल्यावर तू भेटलास. तुझा नंबर देखील तिथं होता. नम्बर मिळाल्यावर तुला ट्रेस करणं फक्त बाकी होतं. म्हणूनच मी इथं माझी रूम बुक केली आणि मी इथं आल्यापासून तुझ्या मागावर होते.)

"देन व्हाय डिड नॉट यू टेल मी ऑल दिस फर्स्ट टाइम यू मेट मी माय डिअर?" मी तिला विचारलं.

"आय वॉनतेड तू कन्फर्म दॅत यू आर द वन आय वॉज इन सर्च फॉर .... माय निकी" (मला खात्री करून घ्यायची होती कि मी ज्याच्यासाठी इथवर आले तो माझा निकीच आहे याची.) तिने पुन्हा मला घट्ट मिठी मारली. एक विलक्षण सत्य साकारलं होतं. अशक्य वाटावी अशी गोष्ट, एक स्वप्न भासावी अशी परीकथा .... साक्षात उतरली होती. माझी करीना... माझी प्रिया माझ्या बाहुपाशात सामावली होती.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे

जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.